# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र.६/२०२१** **दिनांक २३.११.२०२१**
**स्थळ- साईनिवास अतिथीगृह** **वेळ-सकाळी ११.०० वाजता**

**मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथील जनहित याचिका नं.१२०/२०१९ यावर दि. ०९/१०/२०१९ रोजी मा.न्यायालयाने दिलेल्या आदेशान्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी करीता नियुक्त केलेल्या मा.तदर्थ (Ad-hoc) समितीची सभा मंगळवार दिनांक २३/११/२०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील साईनिवास अतिथीगृहामध्ये आयोजित केली असलेबाबत इकडील जा.नं.एसएसएस/वशी-०४/२६८७/२०२१, दि.१५.११.२०२१ अन्वये सर्व मा.सदस्यांना कळविणेत आलेले होते. त्यानुसार सदरहु सभा मंगळवार दिनांक २३/११/२०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता सुरु करण्यात आली.**

**या सभेस खालील मा. सदस्य उपस्थित होते.**

१. **मा. न्या. सुधाकर यार्लगड्डा, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अहमदनगर. तथा अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती.**
२. **मा.श्रीमती भाग्यश्री बानायत,भा.प्र.से.मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी. तथा सदस्य सचिव, तदर्थ (Ad-hoc) समिती.**
३. **मा.श्री.भानुदास ह. पालवे, अपर आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक, तथा सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती**
४. **मा.श्रीमती गीता प्र.बनकर, सहाय्यक धर्मादाय आयुक्त, अहमदनगर, तथा सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती.**

**सभेच्या सुरुवातीस श्री साईबाबांची प्रार्थना करणेत आली.**
**विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरु केली.**

---

**विषय नं.०१** **दि.३०.१०.२०२१ रोजी झालेल्या तदर्थ (Ad-hoc) समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.२७४** **दिनांक ३०.१०.२०२१ रोजी शिर्डी येथे झालेल्या मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, सदरहू इतिवृत्त वाचून कायम करतांना निर्णय क्र.२५६ मध्ये संस्थान प्रशासनातर्फे असे सांगण्यात आले की, पुर्वीपासून विनाअनुदानीत तत्वावरच शैक्षणिक शुल्क घेण्याची प्रथा आहे. नविन धोरणात्मक निर्णय घेण्यात येत नाही. त्यामुळे पुर्वीच्या निर्णयात खालील प्रमाणे दुरुस्ती होणे आवश्यक आहे.**

१. निर्णय क्र.२५६- मंजूर.

(कार्यवाही- श्री साईबाबा महाविद्यालय)

**या ऐवजी खालील प्रमाणे**

**निर्णय क्र.२५६- मंजूर. विनाअनुदानीत महाविद्यालयानुसार शैक्षणिक शुल्क स्विकारणेस मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा महाविद्यालय)**

---

**विषय नं.०२** **चक्रिय पध्दतीने सादर केलेल्या विषयावरील निर्णय वाचून कायम करणे.**

**०१.** **श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकडील वैद्यकीय अधिकारी, ईडीपी मॅनेजर, एस टी/एच ए फॉर बायोमेडीकल वेस्ट मॅनेजर, पब्लीक रिलेशन मॅनेजर यांना माहे २० नोव्हेंबर, २०२० ते २८ जुलै,२०२१ या कालावधीत तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पध्दतीने ११ महिनेसाठी दिलेल्या नेमणूकांचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर त्याच धर्तीवर टप्प्याटप्प्याने पुन्हा नेमणूका देणेबाबत.**

**निर्णय क्र.२७५/१ चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**०२. सन २०२२-२३ करीता बारा महिन्यांचे कालावधीसाठी पाणी पुरवठा विभागास पाणी शुध्दीकरणासाठी आवश्यक ब्लीचींग पावडर, फेरीक ॲलम व क्लोरीन गॅस सिलेंडर खरेदी करणेस व त्यासाठी येणारे खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.२७५/२ चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.**

**(कार्यवाही–पाणीपुरवठा विभाग)**

---

**०३. श्री साईबाबा संस्थानचे सर्व पॉवरींग स्टॅंडबाय जनसेटच्या डिझेल इंजिनचे वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रक्ट सन-२०२२ या वर्षासाठी देणेकामी चक्रीय पध्दतीने मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.२७५/३ चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.**

**(कार्यवाही–विद्युत विभाग)**

---

**०४. संस्थानचे प्रसादालय व लाडू निर्मिती विभागांसाठी मसाले, ड्रायफ्रुटस व इतर किराणामाल खरेदीकामी ई-निविदा प्राप्त न्युनतम दराने खरेदी करणेबाबत.**

**निर्णय क्र.२७५/४ चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.**

**(कार्यवाही–खरेदी विभाग)**

---

**०५. सन २०२१-२२ वर्षाकरीता ई-निविदेचे किराणामाल खरेदीकामी तांत्रिक निविदेमध्ये पात्र ठरलेल्या निविदाधारकांचे नमुने निवडीचे कामकाजाबाबत.**

**निर्णय क्र.२७५/५ चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.**

**(कार्यवाही–खरेदी विभाग)**

---

**०६. श्री साईनाथ रुग्णालयात महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजना (MJPJAY) व प्रधानमंत्री जनआरोग्य योजना (PMJAY) सुरु करणेकामी नविन संगणक संच, यु.पी.एस.स्कॅनर प्रिंटर खरेदी करणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.२७५/६ चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल.)**

---

**०७. सन २०२१-२२ मधील (दि.०१.०१.२०२२ ते दि.३१.१२.२०२२ ) करीता साईआश्रम भक्तनिवास, साई धर्मशाळा विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग, विद्युत, प्लबींग, स्वच्छता इ. दुरुस्ती व देखभालीची कामे व व्दारावती भक्तनिवास विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग/ स्वच्छता कामे आऊटसोर्स ठेकेदाराकडून करुन घेणेकामी दैनिक वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.२७५/७ चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.**

**(कार्यवाही-व्दारावती भक्तनिवास/ साईआश्रम भक्तनिवास/ साई धर्मशाळा)**

---

०८. सन २०२१-२२ साठी (दि.०१.०१.२०२२ ते दि.३१.१२.२०२२) एक वर्ष कालावधीसाठी साईआश्रम भक्तनिवास व साई धर्मशाळा या दोन्ही विभागाकडील इमारतीमध्ये व परिसरात पेस्ट कंन्ट्रोल करणेकामी येणा-या खर्चास तसेच जाहिरातीचा दरपत्रक व दैनिक वर्तमान पत्रात जाहिरात देऊन दरपत्रके मागविणे अथवा पेस्ट टर्मिनेटर्स, पुणे यांना आहे त्याच मंजूर दरात पुढील एक वर्ष कालावधीसाठी मुदतवाढ देणेबाबत चक्रिय पध्दतीने मान्यता मिळणेबाबत.

**निर्णय क्र.२७५/८** चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.

(कार्यवाही-साई धर्मशाळा)

---

**विषय नं.०३** श्री साईबाबा हॉस्पिटलकरीता Liquid Oxygen Dura Cylinder ई-निविदा मागवून खरेदी करणेस व त्याकामी येणा-या रक्कम रु.३०,३८,५००/-चे खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

**निर्णय क्र.२७६** यावर सविस्तर चर्चा झाली. याकामी येणा-या खर्चास तसेच ई-निविदा प्रक्रिया राबविण्यास मान्यता देण्यात आली. तथापी संस्थान प्रशासनाने Liquid Oxygen Gas Plant मध्ये तयार होणारा ऑक्सिजन साठवूण ठेवणेबाबत काही व्यवस्था करता येईल काय? याबाबत माहिती घ्यावी / पडताळणी करावी. (कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

**विषय नं.०४** संस्थान निधीतून बांधण्यात आलेले राज्य परिवहन महामंडळाचे शिर्डी सर्व्हे नं.१७१ मधील बसस्थानक व भक्तनिवास इमारतीचे बांधकाम ठेकेदार पाटील कन्सट्रक्शन अॅन्ड इंफ्रास्ट्रक्चरल लि.पुणे यांचे अंतिम बिलातील उर्वरीत देय रक्कम अदा करणे व संस्थानकडे जमा असलेली सुरक्षा ठेव परत करणेबाबत.

**निर्णय क्र.२७७** यावर सविस्तर चर्चा झाली. प्रस्ताव मंजूर. एकुण रक्कम रु.५० लाख पेक्षा जास्त असल्याने मान्यतेसाठी मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे सिव्हील अॅप्लीकेशन दाखल करण्यात यावे. (कार्यवाही-बांधकाम विभाग/विधी विभाग)

---

**विषय नं.०५** परकीय चलन (FCRA) नोंदणी प्रमाणपत्र नुतनीकरण करणेकामी तदर्थ समिती सदस्यांचे KYC's कागदपत्रे व रक्कम रु.१०/-मात्रचे तिकीट असलेले नोटरी-नोंदणीसह प्रतिज्ञापत्रावर स्वाक्षरी करुन मिळणेबाबत.

**निर्णय क्र.२७८** स्थगीत. (कार्यवाही-लेखाशाखा)

---

**विषय नं.०६** संस्थानला आयकर विभागाच्या रु.३७० कोटी कर भरणा नोटीसांबाबतची सद्यस्थिती व आर्थिक वर्ष २०२१-२२ चे आयकर विवरणपत्र दाखल करणे, करनिर्धारण, फेर करनिर्धारण इत्यादी अनुषंगीक कामकाजाकरीता कर सल्लागार लेखापरिक्षण संस्थेची नियुक्ती करणेबाबत.

**निर्णय क्र.२७९** यावर सविस्तर चर्चा झाली. प्रस्तावातील 'ब' सन २०२०-२१ या आर्थिक वर्षाचे विवरण पत्र ३१ डिसेंबर, २०२१ अखेर दाखल करणे गरजेचे असल्याने ते दाखल करण्यासाठी सध्याचे कर सल्लागार लेखापरिक्षक यांना मुदतवाढ देण्यात आली. प्रस्तावातील 'अ' ची पुर्तता करण्यासाठी प्रस्तावातील 'क' ची कार्यवाही लवकरात लवकर होणे आवश्यक आहे. ती कार्यवाही लवकरात लवकर होण्यासाठी पुढील तीन आर्थिक वर्षासाठी आयकर विवरणपत्र दाखल करणे, करनिर्धारण, फेर करनिर्धारण इत्यादी अनुषंगीक कामकाजाकरीता कर सल्लागार लेखापरिक्षण संस्थेची नियुक्ती करणेसाठी जाहिरातीचा मसुदा लवकरात लवकर तयार करुन मान्यतेसाठी समितीसमोर ठेवण्यात यावा.

(कार्यवाही-लेखाशाखा)

---

विषय नं.०७ श्री साईनाथ रुग्णालयाचे वाढीव तिस-या मजल्याकरीता आणलेल्या केबल ऑक्सिजन प्लान्टकरीता वापरण्यास आलेल्या असल्याने आता वाढीव तिस-या मजल्यावरील इलेक्ट्रीकल लोडला सप्लाय देणेकरीता २४० स्केअर एम.एम.ची इलेक्ट्रीकल केबल, पितळी फ्लॅज टाईप केबल ग्लॅन्ड, ॲल्युमिनियम लग्जची खरेदी करणेकामी येणा-या खर्चास तसेच विहीत पध्दतीने दरपत्रके मागविणेस मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.२८० यावर सविस्तर चर्चा झाली. साईनाथ हॉस्पिटल साठी खरेदी केलेल्या केबल मधुन ६६० मिटर केबल निकड आहे म्हणून तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडून तोंडी आदेश घेऊन वापरली आहे. त्यांचेकडून लेखी आदेश दि.११.०८.२०२१ रोजी घेतल्याचे नमुद आहे. जुन २०२१ मध्ये निकड आहे म्हणून ही केबल वापरल्यानंतर तदर्थ समितीचे पुढील बैठकीमध्ये त्यास कार्योत्तर मान्यता घेणे आवश्यक होते. संस्थानची सदरहु केबल ऑक्सिजन प्लॅन्ट मध्ये वापरल्यामुळे ऑक्सिजन प्लॅन्ट पुर्णत डोनेशन मधुन उभारण्यात आलेला आहे. असे नमुद आहे. यापुढे डोनेशन मधुन असे काम करतांना संपुर्ण बजेट सह व्यवस्थापन समितीपुढे ठेऊन परवानगी घ्यावी. असे नमुद करुन प्रस्तावास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-विद्युत विभाग)

---

विषय नं.०८ श्री साईबाबा संस्थानचे दोन्ही रुग्णालयातील रुग्णांना ने-आण करणेकामी फोर्स कंपनीची बीएस-६ प्रकारातील ट्रॅक्स रुग्णवाहीका खरेदी करणेस व याकामी येणा-या अंदाजे खर्चास आणि कंपनी/अधिकृत पुरवठादार यांचेकडून दरपत्रके मागविणेस मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.२८१ यावर सविस्तर चर्चा झाली. रुग्णवाहीका विविध प्रकारातील वाहनाची प्रत्यक्ष पाहणी करण्यात यावी. वाहन विभागातील तांत्रिक तज्ञ, रुग्णालयातील वापर करणारा तज्ञ, संबधीत आरएमओ व मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे समीतीने वाहनाचा नमुना बोलावून खरेदीचा प्रस्ताव चक्रिय पध्दतीने अथवा नियमित सभेमध्ये जे आगोदर घडेल त्यामध्ये सादर करावा.

(कार्यवाही-वाहन विभाग)

---

विषय नं.०९ औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील कंत्राटी निदेशक यांना केंद्र शासनाच्या डायरेक्टर जनरल ऑफ ट्रेनिंग (DGT) यांचे निर्देशानुसार मानधन लागु करणेबाबत.

निर्णय क्र.२८२ यावर सविस्तर चर्चा झाली. शासनाचे निर्णयाप्रमाणे मंजूर.

(कार्यवाही-औद्योगिक प्रशिक्षण संस्था)

---

विषय नं.१० महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित, पुणे यांची लक्ष्मीवाडी मळा, ता.राहाता येथील शेती महामंडळाची जमीन संस्थानला कायम खरेदी मिळणेकामीचा सुधारीत प्रस्ताव सादर करणेबाबत.

निर्णय क्र.२८३ यावर सविस्तर चर्चा झाली. प्रस्तुतची जागा संस्थानचे जमीनीला लागून आहे. या जागेत शताब्दी महोत्सावातील कार्यक्रम झालेले आहेत. त्यामुळे सदरची जमीन संस्थानला खरेदी करणेकामी शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात यावा. धोरणात्मक विषय असल्याने मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे मान्यतेसाठी सिव्हिल ॲप्लीकेशन दाखल करण्यात यावे.

(कार्यवाही-मालमत्ता विभाग)

---

विषय नं.११ सन २०२२ या वर्षासाठी लिज्जत उडीद पापड खरेदी करणे.

निर्णय क्र.२८४ यावर सविस्तर चर्चा झाली. इतर कंपन्यांचा देखील विचार करण्यास हरकत नाही. याकामी येणा-या खर्चास व ई-निविदा प्रक्रिया राबविणेस मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-खरेदी विभाग)

---

विषय नं.१२ शासकीय अधिकारी/कर्मचारी यांना निवासासाठी संस्थान निवासस्थान उपलब्ध करुन देणेकामी प्रस्तावीत करणेत आलेल्या नियमावलीस मान्यता मिळणे व शासकीय अधिकारी/कर्मचा-यांना संस्थान मालकीचे निवासस्थाने भाडे तत्वावर देणेकामी 'संस्थान अधिनियम,२००४ चे कलम १७(३) नुसार' शासनाचे पूर्व मान्यतेने देणेबाबत.

निर्णय क्र.२८५ यावर सविस्तर चर्चा झाली. प्रस्ताव मंजूर.

(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)

---

विषय नं.१३ निवासासाठी संस्थान निवासस्थान मिळणेबाबत श्री.हर्षवर्धन गवळी, पोलीस निरीक्षक, साई मंदिर सुरक्षा, शिर्डी व श्री.हिरालाल माधवराव पाटील, पोलीस निरिक्षक, शहर वाहतुक नियंत्रण शाखा, शिर्डी यांचे अनुक्रमे दि.२४.०२.२०२१ व दि.१६.१०.२०२१ रोजीचे विनंती अर्जाबाबत.

निर्णय क्र.२८६ यावर सविस्तर चर्चा झाली. प्रस्ताव मंजूर. शासनाची मान्यता घेण्यात यावी.

(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)

---

विषय नं.१४ कोव्हीड-१९ मुळे ज्या विभागांच्या सेवा तात्पुरत्या स्वरुपात खंडीत करणेत आलेल्या आहेत. अशा तात्पुरत्या स्वरुपात खंडीत करणेत आलेल्या ५९८/५९२ कायम कंत्राटी कर्मचारी यांचे माहे जुलै-२०२१, ऑगस्ट-२०२१ व श्रींचे मंदिर भक्तांसाठी दर्शनास खुले होईपर्यंत तात्पुरत्या सेवा खंडीत कालावधीतील मानधन मानवतेच्या दृष्टीकोनातून अदा करणेबाबत.

निर्णय क्र.२८७ यावर सविस्तर चर्चा झाली. संस्थावर किती आर्थिक भार पडेल याचा अभ्यास करुन सविस्तर प्रस्ताव समितीपुढे सादर करावा.

(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)

---

विषय नं.१५ कोरोना विषाणू (कोव्हीड-१९) चे कालावधीतील माहे मार्च-२०२० व माहे एप्रिल-२०२० चे ५९८ संस्थान कंत्राटी कर्मचारी यांचे वेतनाबाबत.

निर्णय क्र.२८८ यावर सविस्तर चर्चा झाली. संस्थावर किती आर्थिक भार पडतो याचा अभ्यास करुन सविस्तर प्रस्ताव समितीपुढे सादर करावा.

(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)

---

विषय नं.१६ सेवाजेष्ठता यादीबाबत.

निर्णय क्र.२८९ यावर सविस्तर चर्चा झाली. प्रथमदर्शनी जुन्या नियमावलीत त्रुटी दिसून येतात त्याकरीता नविन नियमावली तयार करणे आवश्यक वाटते. सेवा जेष्ठता ठरविण्यासाठीची नियमावली तयार करण्यास मान्यता देण्यात आली. अशा नियमावलीचे प्रारुप तयार करण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी यांना प्राधिकृत करण्यात आले. सेवा जेष्ठता यादी तयार करण्याचा निर्णय तहकुब ठेवण्यात आला. नियमावलीचे तयार केलेले प्रारुप समिती सभेपुढे ठेवण्यात यावे.

(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)

---

विषय नं.१७ संस्थान कर्मचा-यांचे पाल्यांचा सन २०२१-२२ वर्षाचा शैक्षणिक शुल्क परतावा करणेबाबत.

निर्णय क्र.२९० यावर सविस्तर चर्चा झाली. या संदर्भात शासनाचे दि.१६ जुलै, २००९ चे शासन पत्रकाचे अवलोकन करणे आवश्यक आहे. सविस्तर प्रस्ताव समिती सभेपुढे सादर करण्यात यावा.

(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)

---

**विषय नं.१८** संस्थानचे बंगलोर व चेन्नई येथील माहिती केंद्रातील कुशल कंत्राटी कर्मचारी यांचे मुदतवाढीबाबत.

**निर्णय क्र.२९१** प्रस्ताव मंजूर. (कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)

---

**विषय नं.१९** मे.व्हि.एम.डिस्ट्रीबुटर्स, नाशिक यांना संस्थानला दुध पुरवठा व्यवस्थीत केला नाही म्हणून दिलेली कारणे दाखवा नोटीस व त्याचा खुलासा आणी खुलाशावर कॅन्टीन विभागाने दिलेले अभिप्राय व त्या अनुषंगाने पुढील निर्णय होणेबाबत.

**निर्णय क्र.२९२** मे.व्हि.एम.डिस्ट्रीबुटर्स, नाशिक यांचे प्रतिनिधी श्री. मनोज उबराणी हे समितीसमोर उपस्थित होते. त्यांना ऐकले. प्रस्तावात नमुद 'A' मंजूर. 'B' सशर्त की दुध खराब असल्याचे आढळून आल्यास करारातील अटी शर्तीनुसार कारवाई करण्यात येईल. 'C' प्रमाणे कारवाईचा आवश्यकता वाटल्यास वापर करता येईल.

(कार्यवाही-खरेदी विभाग)

---

**विषय नं.२०** संस्थान इमारती व परिसरातील दैनदिन साफसफाई करुन कचरा डेपोवर जमा होणारा प्लॅस्टीक कचरा विक्री करणेकामी उच्चतम दरधारकास कार्यादेश देणेबाबत.

**निर्णय क्र.२९३** यावर सविस्तर चर्चा झाली. मंजूर.

(कार्यवाही-आरोग्य विभाग)

---

**विषय नं.२१** श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध मशिन्सचे सन २०२१-२०२२ करीता वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रक्ट करणेबाबत.

**निर्णय क्र.२९४** श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध मशिन्सचे सन २०२१-२०२२ करीता वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रक्ट करणेकामी निम्नतम दरधारकांशी दराबाबत चर्चा वाटाघाटी करण्यात आल्या. चर्चेअंती निम्नतम दरधारकांनी देऊ केलेले अंतिम दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यास मान्यता देण्यात आली. अंतिम दराबाबतचा तक्ता सोबत विषय क्र.२१ म्हणून जोडला आहे.

(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

**विषय नं.२२** संस्थानच्या श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयात नव्याने सुरु होणा-या RTPCR Lab साठी Consumable मटेरीअल खरेदीकामी चर्चा/वाटाघाटी करुन पुरवठा आदेश देणेबाबत.

**निर्णय क्र.२९५** संस्थानच्या श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयात नव्याने सुरु होणा-या RTPCR Lab साठी Consumable मटेरीअल खरेदीकामी निम्नतम दरधारकांशी दराबाबत चर्चा वाटाघाटी करण्यात आल्या. चर्चेअंती निम्नतम दरधारकांनी देऊ केलेले अंतिम दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यास मान्यता देण्यात आली. अंतिम दराबाबतचा तक्ता सोबत विषय क्र.२२ म्हणून जोडला आहे.

(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

**विषय नं.२३** मौजे शिर्डी येथील सर्व्हे नं.१४८ पै.मधील जागेत संस्थानचे अग्निशमन वाहन पार्किंगकरीता पत्राशेड उभारणी करणेकामी प्राप्त झालेल्या ई-निविदेतील निम्नतम दराचे निविदाधारका समवेत चर्चा वाटाघाटी करुन निर्णय होणेबाबत.

**निर्णय क्र.२९६** निम्नतम निविदाधारक यांचेशी दर कमी करणेबाबत चर्चा केली असता त्यांना दर कमी करणेस असमर्थता दर्शविली. ई-निविदेतील नमुद दर स्विकारणेत येऊन कार्यादेश देण्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभाग)

---

**विषय नं.२४** **मौजे निमगांव को-हाळे येथील संस्थानचे श्री साई प्रसादालय परिसरातील अंतर्गत रस्त्याचे मुख्य प्रवेशव्दार ते मेन्टनन्स ब्लॉक या लांबीचे डांबरीकरण करणे व मेन्टेनन्स ब्लॉक ते एलपीजी गॅस प्लॉटं या लांबीतील रस्त्याचे खडीकरण करणे कामासाठी प्राप्त झालेल्या ई-निविदेतील निम्नतम दराचे निविदाधारका समवेत चर्चा वाटाघाटी करुन निर्णय होणेबाबत.**

**निर्णय क्र.२९७** **निम्नतम निविदाधारक यांचेशी दर कमी करणेबाबत चर्चा केली असता त्यांनी दर कमी करणेस असमर्थता दर्शविली. ई-निविदेतील नमुद दर स्विकारणेत येऊन कार्यादेश देण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.२५** **संस्थानच्या निधीतून शिर्डी नगरपंचायत करीता गॅस दाहीनी खरेदी करणेकामी प्राप्त ई-निविदेतील निम्नतम दरधारक मे.उर्जा गॅसीफायर्स प्रा.लि.गोरखपुर (उ.प्र.) यांचेशी चर्चा/वाटाघाटी करुन कार्यादेश देणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.२९८** **मंजूर.**

**(कार्यवाही-मेकॅनिकल विभाग)**

---

**विषय नं.२६** **संस्थानचे विद्युत विभागासाठी दैनंदिन मेन्टेनन्स कामासाठी विद्युत साहित्य खरेदीकामी ई-निविदेत प्राप्त न्युनतम दराबाबत निर्णय होणेबाबत.**

**निर्णय क्र.२९९** **निम्नतम निविदाधारक यांनी दर कमी करणेस असमर्थ असल्याचे ई-मेलव्दारे कळविले आहे. ई-निविदोतील नमुद दर स्विकारणेत येऊन कार्यादेश देण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-खरेदी विभाग)**

---

**विषय नं.२७** **सर्व्हे नं.२/४,३/१ व ३/७ चे ठिकाणचे जुन्या Electrical Substation मधील Cable शिफ्ट करणे, जॉईट देऊन नविन पॅनेलमध्ये जोडणी करणे व Electrical Panel मधील कनेक्शन नविन पॅनलमध्ये जॉईट करणे व जनरेटर सेट डिसमेंटल करुन काढून घेणेकामी उघडण्यात आलेल्या निविदांमधील एल-१ निविदाधारकांशी वाटाघाटी/चर्चा होऊन निर्णय होणेबाबत.**

**निर्णय क्र.३००** **निम्नतम निविदाधारक यांचेशी दर कमी करणेबाबत चर्चा करण्यात आली. चर्चेअंति देऊ केलेले अंतिम दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यास मान्यता देण्यात आली. चर्चेअंती देऊ केलेले अंतिम दराबाबतचा तक्ता सोबत निर्णय क्र.३०० म्हणून जोडण्यात आलेला आहे.**

**(कार्यवाही-विद्युत विभाग)**

---

**विषय नं.२८** **संस्थान मालकीचे मौजे शिर्डी येथील सर्व्हे नं.२ चे क्षेत्रातील मंदिर परिसर गेट नं.१ लगत साईभक्तांचे सोयीसाठी मोबाईल कॅमेरा क्लोकरुम सुविधा पुरविणेकामी श्री साई संस्थान एम्लॉईज क्रेडीट को.ऑप. सोसायटी लि.शिर्डी यांना वापरास दिलेल्या जागा वापराची मुदत वाढवून देणेबाबत मा.चेअरमन, श्री साई संस्थान एम्लॉईज क्रेडीट को.ऑप.सोसा.लि.शिर्डी यांचेकडील पत्र जा.नं.श्रीसासंएक्रेसो/४९/२०२१, दि.२१.०६.२०२१ रोजीचे पत्र.**

**निर्णय क्र.३०१** **यावर सविस्तर चर्चा झाली. प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही-मालमत्ता विभाग)**

---

विषय नं.२९ प्रसार भारती ब्रॉडकास्टींग कॉर्पोरेशन ऑफ इंडीया, मुंबई यांना संस्थान मालकीचे शिर्डी येथील वापरास दिलेली जमीन सर्व्हे नं.१४८ मधील ११४.३२ चौ.मी.बांधीव व २६६.२८ चौ.मी.मोकळी जागा वापराचे मुदतीबाबत.

निर्णय क्र.३०२ यावर सविस्तर चर्चा झाली. प्रस्ताव मंजूर. (कार्यवाही-मालमत्ता विभाग)

---

विषय नं.३० श्री साई संस्थान एम्लॉईज क्रेडीट को.ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांना श्री साईनाथ रुग्णालय येथे संस्थेच्या स्टॉलमध्ये रुग्णाचे नातेवाईकांचे सोईसाठी अल्पोपहार व्यवस्था सुरु करणेस परवानगी मिळणेबाबत मा.चेअरमन, श्री साई संस्थान एम्लॉईज क्रेडीट को.ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांचेकडील जा.नं. श्रीसासंएक्रेसो/७९/२०२१, दि.२८.०७.२०२१ रोजीचे पत्र.

निर्णय क्र.३०३ नामंजूर. (कार्यवाही-मालमत्ता विभाग)

---

विषय नं.३१ श्री साई संस्थान एम्लॉईज क्रेडीट को.ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांना संस्थान मालकीचे मौजे शिर्डी येथील सर्व्हे नं.११४ मधील स्वागतकक्षाचे जागेत बॅग क्लोकरुमसाठी वापरास दिलेल्या जागेच्या वापराची मुदत वाढवून मिळणेकामी मा.चेअरमन, श्री साई संस्थान एम्लॉईज क्रेडीट को.ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांचेकडील जा.नं. श्रीसासंएक्रेसो/४८/२०२१, दि.२१.०६.२०२१ रोजीचे पत्र.

निर्णय क्र.३०४ यावर सविस्तर चर्चा झाली. प्रस्ताव मंजूर. (कार्यवाही-मालमत्ता विभाग)

---

विषय नं.३२ संस्थान मालकीचे मौजे शिर्डी येथील सर्व्हे नं.१ पै.चे क्षेत्रातील मंदिर परिसर व गेट नं.४ लगतचे जागेत साईभक्तांचे सोयीसाठी पादत्राणे व मोबाईल कॅमेरा क्लोकरुम सुविधा पुरविणेकामी श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप. सोसायटी लि.शिर्डी यांना वापरास दिलेल्या जागा वापराची मुदत वाढवून देणेबाबत मा.चेअरमन, श्री साई संस्थान एम्लॉईज क्रेडीट को.ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांचेकडील जा.नं. श्रीसासंएक्रेसो/४७/२०२१, दि.२१.०६.२०२१ रोजीचे पत्र.

निर्णय क्र.३०५ यावर सविस्तर चर्चा झाली. प्रस्ताव मंजूर. (कार्यवाही-मालमत्ता विभाग)

---

विषय नं.३३ संस्थान साईनाथ छाया इमारतीतील श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप. सोसायटी लि.शिर्डी यांचेमार्फत चालवत असलेल्या क्लोकरुम व मोबाईल कॅमेरा क्लोकरुम या व्यवसायासाठी पुढील ११ महिन्यासाठीची मुदतवाढ मिळणेबाबत मा.चेअरमन, श्री साई संस्थान एम्लॉईज क्रेडीट को.ऑप. सोसायटी लि.शिर्डी यांचेकडील जा.नं.श्रीसासंएक्रेसो/९६/२०२१, दि.०९.०८.२०२१ रोजीचे पत्र.

निर्णय क्र.३०६ यावर सविस्तर चर्चा झाली. प्रस्ताव मंजूर.

(कार्यवाही-मालमत्ता विभाग)

---

विषय नं.३४ श्री साईबाबा धर्मादाय हॉस्पिटलमध्ये उपचारार्थ दाखल कोरोना विषाणूने (कोव्हीड-१९) बाधीत रुग्णांचे वैद्यकीय बिलात सवलत देणेबाबत.

निर्णय क्र.३०७ यावर सविस्तर चर्चा झाली. तत्कालीन प्रशासकीय स्तरावर सवलत देण्याचा जो निर्णय घेतला होता. त्याची पार्श्वभूमी समितीला अवगत करावी. तसेच संबधीत विभागाचे प्रमुख यांनी सदरचा प्रस्ताव त्यानंतरच्या तदर्थ समितीचे सभेमध्ये कार्योत्तर मान्यतेसाठी का सादर करण्यात आला नाही, याचा खुलासा घ्यावा. व सविस्तर प्रस्ताव समिती सभेपुढे सादर करावा.

(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

विषय नं.३५ कोरोना आजाराच्या पार्श्वभूमीवर असलेल्या संचारबंदीमुळे उशीराने सादर झालेल्या कायम कर्मचा-यांच्या वैद्यकीय बीलाचा परतावा करणेबाबत.

निर्णय क्र.३०८ मंजूर. (कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

विषय नं.३६ संस्थान कर्मचारी व त्यांचेवर अवलंबीतांचा वैद्यकीय बिलाचा परतावा रक्कम रु.१०,१५,१७५/- मात्र अदा करणेस मंजूरी मिळणेबाबत.

निर्णय क्र.३०९ कोणत्या कालावधीतील रक्कम आहे. यासह सविस्तर प्रस्ताव फेर सादर करावा.

(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

विषय नं.३७ कंत्राटदारामार्फत कार्यरत असलेल्या कंत्राटी कर्मचा-यांचे वैद्यकीय बिलाच्या परताव्याबाबत.

निर्णय क्र.३१० कंत्राटदारामार्फत कार्यरत असलेल्या कंत्राटी कर्मचा-यांचे वैद्यकीय बिलाच्या परताव्याबाबत तरतुद नाही व तसे धोरण नाही. सबब नामंजूर.

(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

विषय नं.३८ जिल्हाधिकारी व अध्यक्ष, जिल्हा सैनिक कार्यालय, अहमदनगर यांना सशस्त्र सेना ध्वजदिन निधीसाठी रु.५० लक्ष मात्र अर्थसहाय्य मागणीचे प्रस्तावावर निर्णय घेणेबाबत.

निर्णय क्र.३११ यावर सविस्तर चर्चा झाली. विभागाचा अभिप्राय परिच्छेद क्र.२ मधे सी.ए. कालबाहय झाला म्हणून अर्ज रद्द करुन प्रस्ताव निरस्त करण्याची सुचना अयोग्य आहे. पीआयएल १२०/२०१९ निकाली काढतांना जरी तो अर्ज निरस्त झाला असेला तरी नविन पीआयएल नं.९८/२०२१ व १००/२०२१ मध्ये तदर्थ समितीला पुन्हा कामकाज पाहण्याचे आदेश झाल्यामुळे निर्णय क्र.५०५ अनुसार सिव्हील ॲप्लीकेशन पुन्हा दाखल करावे. परिच्छेद क्र.५ मध्ये उल्लेख केल्याप्रमाणे हा विषय खाजगी व्यक्तीने केलेला अर्ज नाही. ध्वजनिधीसाठी जिल्हाधिकारी व अध्यक्ष, जिल्हा सैनिक कार्यालय, यांचेकडून आलेली विनंती आहे. निर्णय क्र.५०५, दि.११.१२.२०२० प्रमाणे सी.ए.दाखल करुन मा.उच्च न्यायालयाची मंजूरी घेऊन ध्वजनिधीसाठी रु.५० लाख अर्थसहाय्य देण्याचा प्रस्ताव मंजूर करण्यात आला.

(कार्यवाही-लेखाशाखा/विधी विभाग)

---

विषय नं.३९ श्रीरामपूर येथील उपजिल्हा ग्रामीण रुगणालयास सिटी स्कॅन मशिन, एमआरआय मशिन, सोनोग्राफी मशिनसाठी अनुदान देणेचे प्रस्तावावर निर्णय होणेबाबत.

निर्णय क्र.३१२ धोरण नसल्याने नामंजूर. (कार्यवाही-लेखाशाखा)

---

विषय नं.४० आर्थिक अनुदान मागणी करीता आलेल्या अर्जाबाबत.

निर्णय क्र.३१३ नामंजूर.

(कार्यवाही-लेखाशाखा)

---

विषय नं.४१ श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये जुलै-२०२१ महिन्यात वैद्यकीय बिलात देण्यात आलेली सवलत रक्कम रु.४२,४५,३५२/-ची नोंद घेऊन खर्चास मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.३१४ नोंद घेतली. (कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

**विषय नं.४२** **श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये ऑगस्ट-२०२१ महिन्यात वैद्यकीय बिलात देण्यात आलेली सवलत रक्कम रु.४५,००,२०१/-ची नोंद घेऊन खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.३१५** **नोंद घेतली.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.४३** **श्री साईबाबा संस्थानच्या श्री साई धर्मशाळा-२ मधील CCC व DCHC कोविड सेंटरमधील कोविड रुग्णांना देण्यात आलेल्या मोफत वैद्यकीय उपचार व औषधांसाठी झालेला रक्कम रु.१,३२,६४,०९७/- च्या खर्चाची नोंद घेऊन त्यास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.३१६** **दि.२८.०३.२०२०ते दि.०४.०९.२०२१ पर्यंतचे खर्चाची नोंद घेण्याचा विषय आहे. सदरहु खर्चास तत्कालीन प्रशासनाने त्वरीत तदर्थ समितीपुढे प्रस्ताव ठेऊन किंवा नंतरच्या बैठकीत कार्योत्तर मान्यतेसाठी प्रस्ताव का नाही ठेवला. आणि रक्कम ५० लाख पेक्षा जास्त आहे व धोरणात्मक विषय देखील आहे. तेव्हा या सर्व खुलाशासह फेर प्रस्ताव सादर करावा.**

**(कार्यवाही-श्री साईनाथ रुग्णालय)**

---

**विषय नं.४४** **मा.व्यवस्थापन समितीच्या निर्णयास अनुसरुन श्री साईनाथ रुग्णालयात माहे एप्रिल-२०२१ ते सप्टेंबर २०२१ अखेर वैद्यकीय उपचार व औषधांसाठी झालेल्या रक्कम रु.३,६३,४०,६४३/- च्या खर्चाची नोंद घेऊन त्यास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.३१७** **सहा महिने कालावधीसाठी एकदम मान्यता का घेतली जाते. मासिक मान्यता का घेतली जात नाही, पुर्वपिठीकेसह कारणासहीत फेरसादर करावे.**

**(कार्यवाही- श्री साईनाथ रुग्णालय)**

---

**विषय नं.४५** **माहे एप्रिल-२०२० ते मार्च-२०२१ अखरे लावलेल्या ठेकेदारी कर्मचारी संख्येची नोंद घेणेबाबत.**

**निर्णय क्र.३१८** **नोंद घेतली.**

**(कार्यवाही-कामगार विभाग)**

---

**विषय नं.४६** **शिर्डी नगरपंचायत हद्दीतील रस्त्यांच्या दैनंदिन स्वच्छता कामांचा सहामाई परिक्षण अहवाल नोंद घेणेकामी सादर करणेबाबत.**

**निर्णय क्र.३१९** **मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी अहवालाचे अवलोकन करुन समितीसमोर प्रस्ताव सादर करावा.**

**(कार्यवाही- आरोग्य विभाग)**

---

**विषय नं.४७** **श्री. भाऊसाहेब एकनाथ अनाप, सहा.शिक्षक, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय, यांना गैरशिस्त वर्तनाबाबत ठेवण्यात आलेला ठपका रद्द करणेकरीता मा.अध्यक्ष, व्यवस्थापन समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचेकडेस केलेल्या दि.१५/०६/२०२० रोजीचे अपिल अर्जाबाबत.**

**निर्णय क्र.३२०** **श्री. भाऊसाहेब एकनाथ अनाप, सहा.शिक्षक, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय हे समिती समोर उपस्थित होते. त्यांना ऐकले. वेळेअभावी तहकुब. पुढील सभेत ठेवण्यात यावे.**

**(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.४८** **श्री.अमृत गंगाधर जगताप, सहा.अभियंता (मेकॅनिकल), वाहन विभाग, सध्या मेकॅनिकल विभाग यांचे दि.१२.११.२०२० रोजीचे अपिल अर्जाबाबत.**

**निर्णय क्र.३२१** **श्री.अमृत गंगाधर जगताप, सहा.अभियंता (मेकॅनिकल), वाहन विभाग, सध्या मेकॅनिकल विभाग हे समिती समोर उपस्थित होते. त्यांना अपिल अर्जाचे अनुषंगाने म्हणणे मांडण्यास सांगण्यात आले. त्याचे म्हणणे ऐकुण घेऊन आणि विभागाचे अहवालाचे अवलोकन केल्यानंतर वाहन कर मुदतीत भरण्यामध्ये उशीर झाल्यामुळे दंडाची रक्कम रु.१,४८,९०६/- भरण्याची वेळ आली. प्रशासनाचे वतीने डयुटी लिस्ट चौकशीचे दरम्यान जी हजर करण्यात आली. त्याची शहानिशा करण्यात आली नाही.**

**वाहन कर आणि दंडाची रक्कम भरण्यासाठी ठेवलेली कार्यालयीन टिपणी सादर करतांना फक्त श्री.अमृत जगताप नाही तर त्या विभागाचे संबधीत कर्मचारी किंवा अधिकारी तसेच वाहन विभाग प्रमुख वेळोवेळी भरत गेले.**

**तसेच श्री.अमृत जगताप यांचे कार्यकालाचे आगोदर वाहन कर व दंड याच पध्दतीने भरला गेल्याचा आरोप आहे. त्याची देखील चौकशी व्हावी व संबधीतावर योग्य ती कारवाई करावी.**

**मात्र चौकशी फक्त श्री.अमृत जगताप यांचीच करण्यात आली. मुदतीत वाहन कर भरण्याची जबाबदारी कुणावर होती आणि मुदतीत कर भरण्यात कसूर श्री.जगताप यांचे व्यतिरिक्त वाहन विभाग प्रमुख व त्यांचे अधिनस्त जबाबदार कर्मचारी यांनी केलेली दिसते. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणी फेर चौकशी करुन चौकशी अधिकारी यांचा अहवाल मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, यांचे मार्फत समितीसमोर सादर करावा.**

**फेरचौकशीची कार्यवाही पुर्ण होईपर्यंत श्री.जगताप यांना देण्यात आलेल्या शिक्षेचा अंमल स्थगीत ठेवण्यात यावा. तसेच फेर चौकशी मध्ये श्री.अमृत जगताप यांचे व्यतिरिक्त जे कोणी दोषी आढळतील त्यांचे बद्दल मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी निर्णय घेऊन त्यानंतर पुन्हा श्री.अमृत जगताप यांच्या अपिलात पुढील निर्णय घेतला जाईल. तसेच या अनुषंगाने फेर चौकशीत श्री.अमृत जगताप हे भाग घेऊ शकतात व प्रशासन देखील श्री.अमृत जगताप अधिकचा जादा पुरावा किंवा कागदपत्रे संस्थान प्रशासन सादर करु शकतील.**

**(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.४९** **श्री.किशोर साहेबराव गवळी, प्र.सीसीटीव्ही कंट्रोल सेल प्रमुख, सीसीटीव्ही कंट्रोल सेल विभाग यांचे खाते चौकशी दि.०७.०५.२०२१ रोजीचे अपील अर्जाबाबत.**

**निर्णय क्र.३२२** **वेळेअभावी तहकुब.**

**(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.५०** **श्री.विकास महादेव शिवगजे, सहा.शिक्षक, श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय, शिर्डी यांचे दि.०१.१२.२०२० रोजीचे अपील अर्जाबाबत.**

**निर्णय क्र.३२३** **वेळेअभावी तहकुब.**

**(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.५१** **श्री.विठ्ठल तुकाराम पवार, वर्ग-०४ कर्मचारी, श्री साई आश्रम भक्तनिवास सध्या आरोग्य विभाग यांचे दि.१५.०६.२०२१ रोजीचे अपील अर्जाबाबत.**

**निर्णय क्र.३२४** **वेळेअभावी तहकुब.**

**(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

विषय नं.५२ श्री.विठ्ठल तुकाराम पवार, वर्ग-०४ कर्मचारी, श्री साईबाबा भक्तनिवास सध्या आरोग्य विभाग यांचे दिनांक २०.०७.२०२१ रोजीचे अपील अर्जाबाबत.

निर्णय क्र.३२५ वेळेअभावी तहकुब.

(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)

---

यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयावर चर्चा करण्यात आली.

आयत्या वेळेचा

विषय नं.०१ चक्रिय पध्दतीने सादर केलेल्या विषयावरील निर्णय वाचून कायम करणे.

१. सन २०२१-२२ मधील (दि.०१.०१.२०२२ ते दि.३१.१२.२०२२ अखेर) साईआश्रम भक्तनिवास व साईधर्मशाळा विभागाकडील बेडशीट, उशी कव्हर धुणे /इस्त्री करणे, टॉवेल धुवून ड्रायर करणे, सोलापूर चादर धुणे, चादर धुणे (ब्लॅकेट) व गादीच्या खोळी धुणेकामी दैनिक वर्तमानपत्रात ई-निविदा जाहिरात प्रसिध्द करुन ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणा-या खर्चास चक्रीय पध्दतीने मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.३२६ चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.

(कार्यवाही- साईआश्रम भक्तनिवास/साईधर्मशाळा)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.०२ प्रसादालय, लाडू निर्मिती, कॅन्टीन आणि मंदिर विभागासाठी सन २०२१-२२ या वर्षासाठी गहू, तांदूळ, साखर व हरबरा डाळ खरेदीकामी ई-निविदा प्राप्त न्युनतम दराबाबत निर्णय होणेबाबत.

निर्णय क्र.३२७ निम्नतम निविदाधारक यांचेशी दर कमी करणेबाबत चर्चा करण्यात आली. चर्चेअंती देऊ केलेले अंतिम दर स्विकारणेत येऊन त्यांचा कार्यादेश देण्यास मान्यता आली. चर्चेअंती देऊ केलेल्या अंतिम दराबाबतचा तक्ता सोबत निर्णय क्र.३२७ म्हणून जोडण्यात आलेला आहे.

(कार्यवाही-खरेदी विभाग)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.०३ कॅन्टीन विभागासाठी सन २०२१-२२ (आक्टोंबर २०२१ ते सप्टेंबर, २०२२) या वर्षासाठी चहा पावडर खरेदीकामी वार्षिक ई-निविदा प्राप्त न्युनतम दराबाबत निर्णय होणेबाबत व फिल्टर कॉफीसाठी दरपत्रके मागविणेबाबत.

निर्णय क्र.३२८ निम्नतम निविदाधारक यांचेशी दर कमी करणेबाबत चर्चा करण्यात आली. चर्चेअंती देऊ केलेले अंतिम दर स्विकारणेत येऊन त्यांचा कार्यादेश देण्यास मान्यता आली. चर्चेअंती देऊ केलेल्या अंतिम दराबाबतचा तक्ता सोबत निर्णय क्र.३२८ म्हणून जोडण्यात आलेला आहे.

(कार्यवाही-खरेदी विभाग)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.०४ प्रसादालय विभागासाठी सन २०२१-२२ (आक्टोंबर २०२१ ते सप्टेंबर,२०२२) या वर्षासाठी खाद्यतेल खरेदीकामी वार्षिक ई-निविदा प्राप्त न्युनतम दराबाबत निर्णय होणेबाबत.

निर्णय क्र.३२९ निम्नतम निविदाधारक यांचेशी दर कमी करणेबाबत चर्चा करण्यात आली. चर्चेअंती देऊ केलेले अंतिम दर स्विकारणेत येऊन त्यांचा कार्यादेश देण्यास मान्यता आली. चर्चेअंती देऊ केलेल्या अंतिम दराबाबतचा तक्ता सोबत निर्णय क्र.३२९ म्हणून जोडण्यात आलेला आहे.

(कार्यवाही-खरेदी विभाग)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.०५ प्रसादालय, लाडू निर्मिती, कॅन्टीन आणि मंदिर विभागासाठी सन २०२१-२२ (आक्टोंबर २०२१ ते सप्टेंबर,२०२२) या वर्षासाठी मसाले खरेदीकामी वार्षिक ई-निविदा प्राप्त न्युनतम दराबाबत निर्णय होणेबाबत.

निर्णय क्र.३३० निम्नतम निविदाधारक यांचेशी दर कमी करणेबाबत चर्चा करण्यात आली. चर्चेअंति देऊ केलेले अंतिम दर स्विकारणेत येऊन त्यांचा कार्यादेश देण्यास मान्यता आली. चर्चेअंति देऊ केलेल्या अंतिम दराबाबतचा तक्ता सोबत निर्णय क्र.३३० म्हणून जोडण्यात आलेला आहे.

(कार्यवाही-खरेदी विभाग)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.०६ संस्थानचे प्रसादालय, लाडू निर्मिती, मंदिर व कॅन्टीन विभागासाठी सन २०२१-२२ (आक्टोंबर २०२१ ते सप्टेंबर, २०२२) वर्षासाठी किराणामाल, धान्य, कडधान्य, डाळी, ड्रायफ्रुटस, वनस्पती तूप व इतर वस्तु खरेदीकामी ई-निविदा प्राप्त न्युनतम दराबाबत निर्णय होणेबाबत.

निर्णय क्र.३३१ निम्नतम निविदाधारक यांचेशी दर कमी करणेबाबत चर्चा करण्यात आली. चर्चेअंती देऊ केलेले अंतिम दर स्विकारणेत येऊन त्यांचा कार्यादेश देण्यास मान्यता आली. चर्चेअंती देऊ केलेल्या अंतिम दराबाबतचा तक्ता सोबत निर्णय क्र.३३१ म्हणून जोडण्यात आलेला आहे.

(कार्यवाही-खरेदी विभाग)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.०७ मे.रजवाडी डेअरी प्रॉडक्टस्, मेहसाना, गुजरात यांचे शुध्द तूप प्रोसिसिंग प्लॅन्ट व्हेंडर ऑडीट अहवालाची नोंद घेणेबाबत.

निर्णय क्र.३३२ यावर सविस्तर चर्चा केली. मे.रजवाडी डेअरी प्रॉडक्टस्, मेहसाना, गुजरात यांचे शुध्द तूप प्रोसिसिंग प्लॅन्ट व्हेंडर ऑडीट अहवालाचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.

(कार्यवाही-खरेदी विभाग)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.०८ संस्थानचे लाडू निर्मिती, मंदिर व प्रसादालय विभागासाठी गाईचे शुध्द तूप खरेदीकामी ई-निविदा प्राप्त न्युनतम दरांबाबत निर्णय होणेबाबत.

निर्णय क्र.३३३ संस्थानचे लाडू निर्मिती, मंदिर व प्रसादालय विभागासाठी गाईचे शुध्द तूप खरेदीकामी ई-निविदेतील प्राप्त दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-खरेदी विभाग)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.०९ संस्थानचे मंदिर व मंदिर परिसरातील सर्व इमारतीमध्ये स्थायी अग्निशमन यंत्रणा उभारणी करणेकामी मागविणेत आलेल्या ई-निविदानुसार प्राप्त न्युनतम दरधारकास कार्यारंभ आदेश देणेकामी निर्णय हाणेबाबत फेर सादर.

निर्णय क्र.३३४ संबधीत निम्नतम निविदा धारकांशी दर कमी करणेबाबत चर्चा झाली. दर कमी करणेस तयार नाही. म्हणून याकामी फेर ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात यावी.

(कार्यवाही-फायर अॅन्ड सेफ्टी विभाग)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.१० श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये सप्टेंबर,२०२१ महिन्यात वैद्यकिय बिलात देण्यात आलेली सवलत रक्कम रु.३८,४५,२९९/- ची नोंद घेऊन खर्चास मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.३३५ नोंद घेण्यात आली. (कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.११** **महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत यांना त्यांचे ३३/११ के.व्ही. उपकेंद्रासाठी संस्थान मालकीची मौजे निमगांव-को-हाळे येथील गट नं.८७/८८ क्षेत्र ०.५२ आर इतके क्षेत्राच्या जागा वापरास मुदतवाढ मिळणेबाबत मा.अतिरिक्त कार्यकारी अधिकारी अभियंता (स्था) स्थापत्य उपविभाग, महावितरण, अहमदनगर यांचेकडील पत्र क्र.अकाअ(स्था)बां व सु उपविभाग/अनगर/तांत्रिक नं.४९३ दि.२९.१०.२०२१.**

**निर्णय क्र.३३६** **मंजूर.**

**(कार्यवाही- मालमत्ता विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१२** **ODDISYS INDIA IT SOLUTIONS PVT LTD, PUNE यांचे प्रतिनिधीशी चर्चा झाली. मुख्य**

**निर्णय क्र.३३७** **मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी ODDISYS यांचे ई-मेलचा खुलासा विचारात घेऊन १५ दिवसाचे आत निर्णय घ्यावा.**

**(कार्यवाही- मालमत्ता विभाग)**

---

**वरील निर्णय क्र.२७४ ते ३३७ घेण्यात आले.**
**यानंतर सायं. ०८.३० वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.**

स्वाक्षरीत/-
**(श्रीमती गिता पी.बनकर)**
**सहा.धर्मादाय आयुक्त, अहमदनगर. तथा**
**सदस्य, तदर्थ** (Ad-hoc) **समिती**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी.**

स्वाक्षरीत/-
**(भानुदास ह. पालवे)**
**अपर आयुक्त,नाशिक विभाग, नाशिक. तथा**
**सदस्य, तदर्थ** (Ad-hoc) **समिती**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी.**

स्वाक्षरीत/-
**(श्रीमती भाग्यश्री बानायत,भा.प्र.से.)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी, तथा**
**सदस्य सचिव, तदर्थ (Ad-hoc) समिती.**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी.**

स्वाक्षरीत/-
**(सुधाकर यार्लगड्डा)**
**प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अहमदनगर. तथा**
**अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती.**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी.**